आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद, महाराष्ट्र

## School Leadership Academy

## Maharashtra

## मोड्यूल क्र.९

# व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन यात शालेय नेतृत्वाची भूमिका

# School Leadership and Vocational Career Guidance

**प्रस्तावना:**



शाळेच्या मुख्याध्यापकांची विद्यार्थ्यांच्या विकासात खूप महत्वाची भूमिका असते. २१ वे शतक हे ज्ञान विज्ञानाचे युग आहे. विज्ञानतंत्रज्ञानातील प्रगती खूप झपाट्याने होत आहे. महाविद्यालये उपलब्ध झाल्यामुळे मुलांचे शिकण्याचे प्रमाण बऱ्यापैकी वाढले आहे. शाळा हे ग्रामीण भागात, दुर्गम डोंगराळ भागात, आदिवासी भागातील महत्त्वाचं ठिकाण आहे; जिथे परिसरातील मुले शिकतात, घडतात आणि आपले भविष्य घडवितात. शाळेच्या प्रमुख घटकांचा विचार केला तर मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, शैक्षणिक साहित्य, अध्यापन पद्धती, पर्यवेक्षीय यंत्रणा, परिसर, भौतिक सुविधा इत्यादी अनेक बाबी डोळ्यांसमोर येतात. शाळेमध्ये काय काम असावे, विद्यार्थ्यांपर्यंत कोणत्या गोष्टी प्रभावीपणे पोहोचाव्यात या संदर्भात मुख्याध्यापक महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यामुळे त्यांचा दृष्टिकोन खूप महत्त्वाचा असतो. त्यांनी पुढाकार घेऊन उपलब्ध असलेले सर्व मनुष्यबळ, भौतिक सुविधा, परिसर व वातावरण लक्षात घेऊन शाळेतील मुलांच्या प्रगतीसाठी अचूक नियोजन व नियोजनाप्रमाणे अंमलबजावणी केली तर त्याचा फायदा विद्यार्थ्यांना नक्कीच होतो. सद्य:स्थितीत शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ते महाविद्यालय शिक्षण घेणाऱ्या, तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांसमोर अनेक आव्हाने आहेत. विद्यार्थी शिकत असतात. दहावीपर्यंत शिकल्यानंतर, कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा, कोणत्या क्षेत्रात जायचे कुठे नोकरी करायची, नेमकं काय करायचे अशा प्रकारचे प्रश्न सगळ्यांनाच पडतात, पण या प्रश्नाचं उत्तर प्रत्येकालाच मिळते असे नाही. अशावेळी जवळ कोणते कॉलेज आहे, पैसे कुठे जास्त लागणार नाहीत, कोणत्या प्रकारच्या शिक्षणामुळे नोकरी मिळेल असे सगळे निकष लावून मुले शिकत राहतात त्या वेळी त्या मुलांमध्ये असलेले टॅलेंट बाहेर येईलच असे सांगता येत नाही. या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतील अशी एक व्यवस्था तयार करण्याची गरज निर्माण झाली आणि त्यातूनच व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन याची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांचा कल विचारात घेऊन त्यांना त्यांच्या आवडीनुसार व क्षमतेनुसार

योग्य वेळी योग्य क्षेत्राची निवड करण्यास मदत केल्यास, त्यांच्या उपजत कलागुणांना पुरेसा वाव मिळतो. व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई आणि विभागीय कार्यालय नागपूर, अमरावती, नाशिक, पुणे, मुंबई, औरंगाबाद, लातूर, कोल्हापूर विद्यार्थ्यांचे विविध शैक्षणिक क्षेत्रांच्या संदर्भात मार्गदर्शन आणि समुपदेशन करत होते, पण याचा लाभ फारच कमी विद्यार्थ्यांना मिळायचा. व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था मुंबई ही संस्था व संस्थेच्या विभागीय कार्यालयांमार्फत गेल्या 65 वर्षांपासून माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशनाचे काम करीत आहे. संस्थेचे कामकाज व्यापक प्रमाणावर करण्यासाठी व राज्यातील विद्यार्थ्यांच्या निकोप मानसिक विकासासाठी शासनाने शासन निर्णय काढलेले आहेत. कलचाचणीचे स्पष्टीकरण करताना त्याबाबत सविस्तर विचार करण्यात आलेला आहे. माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक समस्या आहेत. त्यांच्या या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. या वयातील विद्यार्थ्यांची भावनिक व मानसिक गरज लक्षात घेऊन त्यांच्या अंगी असलेल्या क्षमता, कौशल्य, आवड-निवड, कल या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांचे समुपदेशन करणे गरजेचे आहे. आज अत्याधुनिक तंत्रज्ञान अस्तित्वात आहे. या तंत्रज्ञानाचा योग्य वापर जीवन समृद्ध करण्यासाठी करता येतो; परंतु या तंत्रज्ञानाच्या अयोग्य किंवा चुकीच्या पद्धतीच्या वापराने शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे आयुष्य भरकटण्याची शक्यता आहे. त्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने त्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले तर या मुलांना भविष्य घडविण्याच्या दृष्टीने दिशा मिळेल. जेव्हा विद्यार्थी दहावीची परीक्षा देतात तेव्हा आपला मित्र किंवा मैत्रीण आर्ट्स शाखेला जात आहेत  किंवा इंजीनियरिंगला जात आहेत म्हणून मी पण जातो किंवा जाते असे ठरविणारे पुष्कळ विद्यार्थी आहेत. अमुक कॉलेज गावात आहे, बाहेर जाणे आपल्याला नाही परवडणार म्हणून काही मुले, आवडत असो वा नसो, जे कॉलेज, जी शाखा गावात आहे तिथेच ऍडमिशन घेतात. कधी कुठेतरी तडजोड करून आयुष्यभर जगत राहतात. कोणताही शिक्षणक्रम किंवा व्यवसाय निवडण्यापूर्वी विद्यार्थ्यांचा कल, त्याची आवड, त्यांच्या बुद्धीची कुवत समजून घेणे,  खूप गरजेचे झाले आहे. काही मनोवैज्ञानिक, मानसशास्त्रीय चाचण्या असतात, त्याद्वारे विद्यार्थ्यांचा कल, आवड, बुद्धिमत्ता समजण्यास  मदत होते. एवढेच नाही तर शिक्षणक्रम व व्यवसाय यांचा सुंदर मेळ घालता येतो. या चाचण्यांचा उपयोग पालकांना होतो. कारण यामुळे आपल्या पाल्यांकडून कडून पालकांच्या अवास्तव अपेक्षांना थांबविता येते आणि मुलांची आवड, क्षमता, कल यांना प्राधान्य द्यायचे  असते याची जाणीव पालकांना होते. नवनवीन क्षेत्रांमध्ये असंख्य व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्या अभ्यासक्रमांबाबत सविस्तर माहिती, आवडीनुसार व क्षमतेनुसार कोणता अभ्यासक्रम निवडावा याबाबतचे मार्गदर्शन इयत्ता दहावी किंवा बारावीनंतर विद्यार्थ्यांना मिळाले, तर ही मुलं जीवनात नक्कीच यशस्वी होऊ शकतील, आणि आयुष्यभर आवडीच्या कामात स्वतःला गुंतवतील.

महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेमध्ये माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावी मध्ये व्यवसायिक मार्गदर्शन व त्या संदर्भात समुपदेशनाचा  म्हणजेच करियर गायडन्स चा लाभ मिळावा यासाठी महाराष्ट्र सरकारने 2015-16 या सत्रापासून कलचाचणी घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. कलचाचणीच्या आधारे शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्राच्या निवडीस साहाय्य केले जाते.Online पद्धतीने कलचाचणी घेऊन हेल्पलाइनच्या मदतीने मार्गदर्शन व समुपदेशन केले जाते.

**मोड्यूल  अध्ययनाची उद्दिष्टे -**

1. व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन संकल्पना समजून घेणे.
2. विद्यार्थ्यांना योग्य रीतीने व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन करणाऱ्या मुख्याध्यापकांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
3. माध्यमिक स्तरावरील कलचाचणीची सद्य:स्थिती समजून घेणे.
4. कलचाचणीच्या उपयुक्ततेचा अभ्यास करणे.

**संबंधित विषयाची संकल्पना -**

एखादे काम करीत असताना साधारणपणे शीर्षक, गरज व महत्त्व, उद्दिष्टे, संकल्पना, स्पष्टीकरण, कार्यात्मक व्याख्या, कार्यपद्धती, निष्कर्ष, उपयोगिता, संदर्भसूची या मुद्द्यांच्या संबंधित संशोधन, उपक्रम, प्रकल्प, लेखन  करावे लागते. मोड्यूल लेखन करताना त्यामध्ये अंतर्भूत काही शब्द, संबोध, संकल्पनांचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्या विषयाच्या अनुषंगाने त्या विशिष्ट शब्दाचा नेमका अर्थ या ठिकाणी काय आहे. त्याचे संदर्भ काय आहेत याबाबत माहिती असणे गरजेचे आहे. सदर मोड्यूलमध्ये पण असे काही संबोध आहेत, ज्या संबोधांचा अर्थ सगळयांना माहीत असावा. त्याविषयीच्या संकल्पना स्पष्ट असाव्यात म्हणूनच खालीलप्रमाणे संकल्पना स्पष्ट करण्यात येत आहे.

**व्यावसायिक मार्गदर्शन -**




प्रत्येक व्यक्तीला आपल्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी काही काम, नोकरी- व्यवसाय करावा लागतो. याविषयीची तयारी शालेय जीवनात होत असते. फक्त वयाच्या 10-12 वर्षापर्यंत मुलांना याविषयीची जाणीव नसते. माध्यमिक शाळेच्या इयत्ता  इयत्ता10 वी च्या अखेरीस मुलांना याविषयी विचार करावा लागतो.करिअर च्या दृष्टीने कोणता अभ्यासक्रम व व्यवसाय शिक्षणक्रम निवडावा याविषयी असंख्य प्रश्न पालक व विद्यार्थ्यांच्या मनात असतात. या प्रश्नांची उकल व्यावसायिक मार्गदर्शनामुळे नक्कीच होते.

व्यवसाय मार्गदर्शन म्हणजे व्यवसायासंबंधी किंवा व्यवसाय विषयक मार्गदर्शन असा अर्थ साधारणपणे घेतला जातो; परंतु व्यवसाय मार्गदर्शन या शब्दांची करिअर मार्गदर्शन या शब्दासोबत सांगड घातल्यास बदलत्या काळातील या विषयाचे महत्त्व लगेच आपल्या लक्षात येते. व्यवसाय मार्गदर्शन ही संकल्पना या क्षेत्रातील अनेक तज्ञांनी व्याख्येद्वारे स्पष्ट केली आहे. अमेरिकन वोकेशनल गायडन्स असोसिएशनने व्यवसाय मार्गदर्शनाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. " एखादा व्यवसाय निवडून, त्या व्यवसायासाठी आवश्यक ती पूर्वतयारी करणे व त्या व्यवसायात प्रवेश करून प्रगती करणे व  या संबंधित व्यक्तीला साहाय्य करण्याची प्रक्रिया म्हणजे व्यवसाय मार्गदर्शन होय." या विषयाच्या अध्ययन-अध्यापनातून विद्यार्थ्याला त्याच्या भविष्यकालीन जीवनाविषयी तयारी करण्यास, त्याचे व्यक्तिमत्व विकसित करण्यास, त्यास अनुरूप असा शिक्षणक्रम/व्यवसाय अभ्यासक्रम निवडण्यास, आवश्यक कौशल्य प्राप्त  करण्यास, जीवनात प्रगती करून यशस्वी होण्यास, तसेच वर्तमान आणि भविष्यात योग्य प्रसंगी योग्य प्रकारे समायोजन साधण्यासाठी साहाय्य करता येते.

व्यवसाय मार्गदर्शन आणि समुपदेशनामुळे विद्यार्थ्यांना स्वतःतील क्षमता, अभिरुची, बौद्धिक कुवत तसेच कल या संदर्भात माहिती मिळते. त्यांना शालेय विषय व करिअरच्या संधी यांविषयी माहिती मिळण्यास मदत होते. विद्यार्थी करिअरच्या अनुषंगाने आवश्यक असलेली कौशल्ये स्वतःमध्ये विकसित करण्यासाठी प्रवृत्त होतात. विद्यार्थ्यांना योग्य अभ्यासक्रम व व्यवसाय निवडी संबंधात त्यांच्या क्षमतांची आणि त्या अनुषंगाने  उपलब्ध स्त्रोतांची जाणीव करून दिली जाते. उपलब्ध असलेली करिअरची असंख्य क्षेत्रे, अभ्यासक्रम, पदविका, short term कोर्सेस, long term कोर्सेस, सर्टिफिकेट कोर्सेस हे सर्व अभ्यासक्रम आणि भविष्यातील संधी, हे अभ्यासक्रम चालविणाऱ्या शासकीय आणि खाजगी संस्था, प्रवेश घेण्याची प्रक्रिया, शिष्यवृत्त्या इत्यादी बाबत माहिती मिळविण्यास विद्यार्थी प्रवृत्त होतात.

**समुपदेशन  -**

समुपदेशन म्हणजे लाभार्थींची समस्या सोडविण्यासाठी समुपदेशक व लाभार्थी या दोघांमध्ये मैत्रीपूर्ण वातावरण व सामंजस्याने होणारे हेतुपूर्वक संभाषण होय.समुपदेशन ही एक मानस शास्त्रीय प्रक्रिया असून त्याचा लाभार्थी आणि समुपदेशक या दोघांच्याही मानसिकतेवर परिणाम होतो. दोघेही परस्परांच्या मानसिकतेवर परिणाम करीत असतात. त्यामुळे लाभार्थी स्वतःच्या समस्या सोडविण्यास समर्थ होत असतात. निर्देशनाशिवाय समुपदेशन व समुपदेशनाशिवाय निर्देशन मनुष्याच्या कोणत्याही कामाचे नसते. निर्देशन आणि समुपदेशन एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समुपदेशनाशिवाय निर्देशन हे व्यर्थ आहे. याविषयी सी.वी. गुडे यांनी म्हटले आहे की, "समुपदेशन हे एकटे किंवा वैयक्तिकरीत्या शैक्षणिक व्यावसायिक तसेच व्यक्तिगत रूपात तत्संबंधित संबंधांच्या समाधानामध्ये मदत करते. यामध्ये सर्व तथ्यांचे वर्गीकरण, अध्ययन आणि विश्लेषण केले जाते. समस्यांचे समाधान विशेषतः विद्यालये,  सामुदायिक साधने यांच्या मदतीने शोधले जाते. आणि समुपदेशन प्राप्त करणाऱ्याला आत्म निर्णयाच्या क्षमतेशी अवगत केले जाते".

समुपदेशन आणि निर्देशनामध्ये अत्यंत जवळचा घनिष्ठ संबंध आहे. या संबंधांच्या अर्थाकरिता समुपदेशनाचे स्वरूप, तत्त्वज्ञानी, विस्तार तसेच प्रकल्प प्रक्रियांवर लक्ष देण्याच्या सोबतच व्यक्तीची प्रवृत्ती किंवा करिअर संबंधी आवश्यकताना समजणे आवश्यक आहे. समुपदेशन ही एक कला आहे आणि विज्ञान सुद्धा आहे परंतु समुपदेशन हे व्यक्तिनिष्ठ असते तेव्हा ते केलेले कार्य असते आणि तेव्हा यामध्ये वस्तुनिष्ठतेवर जोर दिला जातो, त्यामुळे त्याचे स्वरुप वैज्ञानिक होत असते



**समुपदेशनाची व्याख्या -**

प्राचीन काळापासून समुपदेशन हे मानव समाजात कोणत्या ना कोणत्या रुपात विद्यमान राहिले आहे. समुपदेशनाचा व्यापक अर्थ लक्षात येण्याकरिता काही शास्त्रज्ञांच्या व्याख्या पाहणे आवश्यक आहे त्या खालीलप्रमाणे आहेत.

- **रॉबिसन्स** - समुपदेशन हे दोन व्यक्तींच्या परिस्थितीचा समावेश करतो. ज्यामध्ये एका व्यक्तीला त्याच्या स्वतःच्या तसेच पर्यावरणामध्ये अपेक्षाकृत प्रभावी समायोजन करण्यात मदत करते.
- **कार्ल रोजर्स-** समुपदेशन एका निश्चितच रूपाने निर्मित स्वीकृत संबंध आहे, जो अशिलाला त्या मर्यादेपर्यंत समजावण्यात मदत करतो, ज्यामध्ये ते आपल्या ज्ञानाच्या प्रकारांमध्ये विद्यात्मक कार्यामध्ये अग्रेसर होऊ शकतील.
- **कलचाचणी -** व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था मुंबई व संस्थेच्या विभागीय कार्यालयांमध्ये फारच कमी प्रमाणात प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध आहे. विद्यार्थी संख्येच्या तुलनेत समुपदेशकांची संख्या पुरेशी नाही. त्यामुळे व्यावसायिक मार्गदर्शन व समुपदेशन यांचा लाभ फारच थोड्या विद्यार्थ्यांना होतो. याकरिता महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न, राज्यातील सर्व माध्यमिक शाळांतील इयत्ता दहावीत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची मानसशास्त्रीय कलचाचणी घेण्याचे ठरविलेले आहे. या माध्यमातून त्यांना उच्च शिक्षण अथवा व्यवसायासाठी योग्य क्षेत्राची निवड करण्यास सहाय्य करून आवश्यकतेनुसार वैयक्तिक मार्गदर्शन व समुपदेशन करण्याचे धोरण शासनाने निश्चित केलेले आहे. विद्यार्थ्यांना स्वतःच्या कुटुंबाबरोबरच भारतीय समाजरचनेचा एक जबाबदार व सुसंस्कृत नागरिक म्हणून घडविण्यासाठी अनुरूप मार्गदर्शन व साहाय्य या कलचाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळत आहे.

**कलचाचणी आयोजनाचे उद्देश -**

1. क्षेत्राची निवड करण्यास मार्गदर्शन करणे.
2. विद्यार्थी व पालक यांना विविध शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांची माहिती देऊन जनजागृती करणे.

**कलचाचणीची कार्यपद्धती-** विद्यार्थ्यास स्वतःच्या कुटुंबाबरोबरच भारतीय समाजरचनेचा एक जबाबदार व सुसंस्कृत नागरिक म्हणून घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना अनुरुप मार्गदर्शन व साहाय्य करणे.

- मानसशास्त्रीय कसोट्या तयार करणे. या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या सल्ल्याने याविषयीची जबाबदारी व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था मुंबई यांचेकडे सोपविलेली आहे.
- ऑनलाइन संगणक प्रणाली विकसित करणे. तयार असलेल्या मानसशास्त्रीय कसोट्या ऑनलाइन पद्धतीने घेण्याकरिता माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचेकडे जबाबदारी सोपविलेली आहे.
- ज्या ठिकाणी ऑनलाइन पद्धतीने कलचाचणी घेणे शक्य नाही, तेथे ऑफलाइन पद्धतीने कल चाचणी घेण्याची व्यवस्था असेल.
- कसोटीच्या अहवालानुसार आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करण्याची व्यवस्था.
- महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे येथे हेल्पलाइन
- विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्याची व्यवस्था संबंधित विभागीय व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, जिल्हास्तर जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था या कार्यालयावर आहे .
- ऑनलाइन परीक्षा देणे सर्वच विद्यार्थ्यांना शक्य नाही. त्यामुळे काही मुले यापासून वंचित राहतात. काही विद्यार्थी अति दुर्गम डोंगराळ भागात राहतात. विद्यार्थ्यांना तसेच काही ठिकाणी शिक्षकांना सुद्धा तंत्रज्ञानाचे ज्ञान तोकडे असते. संगणक हाताळण्याचे कौशल्य नसते. तसेच बऱ्याचदा पालक उदासीन असतात. आपल्या राज्यात समुपदेशकांची संख्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत कमी आहे. या सर्व मर्यादांमुळे कलचाचणी प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आव्हानात्मक आहे.

**महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून शासन निर्णय क्रमांक:व्यमासं-३२१४/(५२ /२०१४)प्रशिक्षण दिनांक 30 ऑक्टोबर, 2014 हा शासननिर्णय** काढण्यात आला. यामध्ये राज्यातील विद्यार्थ्यांच्या निकोप व मानसिक विकासासाठी शासन प्रयत्नशील असून सदर क्षेत्रात भरीव कामकाज होण्यासाठी, सदर क्षेत्रास बळकटी आणण्यासाठी शासन स्तरावर राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन व सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन व सल्लागार समिती, राज्यातील प्रशिक्षित शिक्षकांचा डेटाबेस तयार करणे, मास्टर ट्रेनर किंवा शासनाचे समुपदेशक घोषित करणे, सध्याच्या स्पर्धात्मक जगात पुढे जाण्यासाठी मुलांची मानसिकता तयार होण्यासाठी धोरण तयार करणे, मुलांना मानसशास्त्रीय साहाय्य करणे, इत्यादी कामांवर नियंत्रण करते.


कार्यारंभ

२७ डिसेंबर ते १५ जानेवारी दरम्यान चाचणी

मोबाईल व संगणकाच्या सहाय्याने तपासला जाणार विद्यार्थ्यांचा 'कल'


लोकमत

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी कल, अभिक्षमता चाचणीस सुरुवात!

जिल्हास्तरीय समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन व सल्लागार समिती सुद्धा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी काम करते. मुलांचा कल आवड लक्षात घेऊन त्या त्या क्षेत्रातील पुढील शिक्षणाची व त्या क्षेत्रातील संधी या विषयी मुलांना मार्गदर्शन करते.

**शासन निर्णय क्रमांक:परीक्षा-२०१५/प्र.क्र.२४९/एसडी-२ दिनांक 10नोव्हेंबर 2015**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशनाचे काम प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. दहावी नंतर पुढील शिक्षणाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यासंदर्भात बरेच विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झालेला दिसून येतो. या परिस्थितीत त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते. विद्यार्थ्यांचा कल विचारात घेऊन त्यांना त्यांच्या आवडीनुसार व क्षमतेनुसार वेळीच शैक्षणिक क्षेत्र निवडीस मदत केल्यास त्यांच्या उपजत कलागुणांना पुरेसा वाव मिळतो. विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाकडे वाढणारा कल लक्षात घेता त्यांना या संदर्भात शास्त्रीयदृष्ट्या योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक असल्याने मानसशास्त्रीय कसोट्यांची उपयुक्तता विचारात घेऊन याचा लाभ देण्याच्या दृष्टीने मानसशास्त्रीय कसोट्यांद्वारे उच्च शिक्षण किंवा व्यवसायासाठी मार्गदर्शन करण्याकरिता धोरण व कार्यपद्धती या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न, राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमधील इयत्ता दहावीमध्ये शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची मानसशास्त्रीय चाचणी कल चाचणी घेण्यात येते. या माध्यमातून त्यांना उच्च शिक्षण अथवा व्यवसायासाठी योग्य क्षेत्राची निवड करण्यास साहाय्य करून आवश्यकतेनुसार वैयक्तिक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात येते.




**सांख्यिकीय माहिती -**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, युनिसेफ आणि आय ड्रीम करियर यांच्या सहकार्याने संयुक्तरित्या महाकरिअर पोर्टल सुरू केले आहे. या पोर्टल वर इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर संबंधी हवी असलेली माहिती एका क्लिकवर सहज उपलब्ध होऊ शकते. 13,728 शाळांमधील 37.9 लाख विद्यार्थ्यांना या पोर्टल चा उपयोग होत आहे. या पोर्टलवर 555 व्यावसायिक आणि कौशल्याधिष्ठित करियरची माहिती मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे. येथे 31,122 महाविद्यालये व व्यावसायिक संस्था, 1127 प्रवेश परीक्षांची माहिती तसेच 1127 शिष्यवृत्ती यांची माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. राज्यात 420 समुपदेशक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यरत आहेत, ज्यांच्या मार्गदर्शनाने राज्यातील विद्यार्थ्यांना स्वतःचे करिअर निवडण्यास मदत मिळत आहे.

- नागपूर जिल्ह्यात एकूण 13 तालुके व 4 URCs आहेत.
- या जिल्ह्यात माध्यमिक शाळांची संख्या 773 एवढी आहे.
- या 773 शाळांमधून सन 2020 मध्ये दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या एकूण 60172 आहे.
- जिल्ह्यातील कल व अभिक्षमता देणारे विद्यार्थी 59831 एवढे होते.

- परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी 99.43% विद्यार्थ्यांनी कलचाचणी दिली.
- कलचाचणीच्या अहवालाच्या आधारे समुपदेशकांनी 16864 विद्यार्थ्यांचे समुपदेशन केलेले आहे.

**व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन यांबाबत शालेय नेतृत्वासमोर असलेली आव्हाने---**

व्यवसाय निवड ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे वयाच्या 16 ते 18 वर्षांच्या टप्प्यावर पुढे तीस-चाळीस वर्ष आपल्याला समृद्ध जीवन जगण्यासाठी नेमके करायचे आहे हे ठरविणे व पूर्णत्वास नेणे ही बाब सोपी नाही. अभ्यासक्रमाची असंख्य क्षेत्रे सद्य:स्थितीत मुलांसाठी उपलब्ध आहेत. त्यामुळे ही मुले दहाव्या वर्गाची परीक्षा देईपर्यंत जर नेमके कुठे जायचे आहे किंवा भविष्यात काय करायचे आहे हे ठरवित असतील तर पुढे त्या दिशेने जाणे सोपे होईल. व्यवसाय मार्गदर्शन आणि समुपदेशन या विषयांच्या अनुषंगाने विविध स्तरांवरील आव्हाने आहेत. सतत आपल्या ध्येयाच्या दिशेने प्रयत्न करून या आव्हानांवर मात करता आली, तर निश्चितपणे या विषयाला न्याय मिळू शकेल.

**विद्यार्थी -**

दहावी किंवा बारावीची परीक्षा देण्याच्या या काळामध्ये विद्यार्थी वयाच्या किशोरवयीन टप्प्यावर असतात.भावनिक व मानसिक संघर्षाचा हा काळ असतो. या काळात मुलांमध्ये शारीरिक बदल पण झपाट्याने होत असतात. मानसिक स्थैर्य नसते. त्यामुळे आपल्या भविष्याबद्दल ठरविणे कठीण जाते.



आपल्या स्वतःमधील क्षमता, अभिरुची, परिस्थिती याचा विचार न करता मित्रमंडळींचे त्याचे अनुकरण करण्यावर भर असतो. काही ठिकाणी मुलांची शिकण्याची इच्छा असूनही, आर्थिक परिस्थितीमुळे शिकण्यामध्ये मध्ये अडचण निर्माण होते. मुलांना काम करून कुटुंबाला आर्थिक मदत करावी लागते. या वयामध्ये मुले व्यसनांच्या आहारी जाण्याची शक्यता अधिक असते.
मुलांना बऱ्याचदा भावनांचे ताणाचे व्यवस्थापन करता येत नाही. एखाद्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यानंतर त्यामध्ये येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शनाची गरज असते. बऱ्याचदा विद्यार्थ्यांना सायन्स, कॉमर्स, आर्ट्स, इंजिनियरिंग, मेडिकल एवढ्याच शाखा माहीत असतात. असंख्य व्यवसायिक अभ्यासक्रम, पदविका, सर्टिफिकेट कोर्स, short term कोर्स, long term कोर्स, विविध क्षेत्रे व तिथे प्रवेश घेण्याच्या पद्धती, मिळणाऱ्या शिष्यवृत्या, भविष्यातील संधी यांविषयी माहितीच नसते. अशावेळी मार्गदर्शकाची खूप गरज असते.

**पालक –**

ज्या घरात आई-वडील दोघांनाही कामानिमित्त बाहेर जावे लागते, त्यांना मुलांकडे फार लक्ष्य देता येत नाही. काही वेळा पालक आपल्या स्वतःच्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा मुलांवर लादत असतात. "मला डॉक्टर व्हायचे होते पण मी नाही होऊ शकले आता तू तरी डॉक्टर हो" असे ते म्हणतात. यावेळी ते मुलांची बौद्धिक क्षमता, आवड, कल याचा विचार करीत नाहीत. त्यामुळे मुलांवर ताण येतो. कधीकधी इतरांच्या मुलांबरोबर तुलना केली जाते. काहीवेळा मुलांची बौद्धिक क्षमता आवड अभिरुची सर्व असूनही पालकांची आर्थिक परिस्थिती सर्व सुविधा पुरविण्याची नसते. कधीकधी पालकांची व्यसनाधीनता, त्यांची मानसिकता ही मुलांच्या शिकण्याच्या आड येते. त्यामुळे पालक व विद्यार्थी दोघांनाही ताण येतो. अशा वेळी काय करावे सुचत नाही हे एक प्रकारचे आव्हान पालकांसमोर असते.

**शिक्षक –**

शिक्षक विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करीत असतात. आपला विद्यार्थी उच्च पदावर असण्याचा आनंद त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना जसा होतो, तसाच तो त्याच्या शिक्षकांनाही होतो. वर्गामध्ये पन्नास विद्यार्थी असतात. तीन-चार वर्ष शिक्षक या मुलांसोबत असतात. त्यामुळे शिक्षकाला स्वतःच्या विद्यार्थ्यांची चांगली ओळख असते. काही विद्यार्थी बुद्धीने हुशार असतात. विशिष्ट कौशल्य व क्षमताही त्यांच्या मध्ये असतात, पण घरातील वातावरण, पालकांची उदासीनता मुलांच्या शिक्षणाच्या आड येते. कधीकधी पालक मुलांकडून अवास्तव अपेक्षा करत असतात. क्षमता नसताना, कल किंवा आवड नसताना मुलांना कोणत्यातरी भारी कोर्सला घालतात. दोन्ही परिस्थितीमध्ये शिक्षकांसमोर एक प्रकारचे आव्हान असते. शिक्षक आणि मुख्याध्यापक यांनी यामध्ये मध्यस्थी करून पालकांचे, विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले तर काही प्रमाणात विद्यार्थ्यांना न्याय मिळू शकतो. ही परिस्थिती, खूप कौशल्याने हाताळावी लागते. शिक्षकाच्या मध्यस्थीमुळे, पालक-शिक्षक मतभेदामुळे कधीकधी परिस्थिती सुलभ होण्याऐवजी अधिक गुंतागुंतीची होते. सर्व बाबींचा तारतम्याने विचार करणे हे शिक्षकांसाठी एक आव्हानच आहे.

**समाज –**

परिसरातील, गावातील, मुलांना घडवण्याची जबाबदारी समाजाचीही आहे. प्रत्यक्ष नाही पण अप्रत्यक्षपणे परिसराचा, तेथील वातावरणाचा, परिणाम विद्यार्थ्यांवर होत असतो. आपल्या गावातील मुलांना योग्य वळण लागावे त्यांना योग्य दिशा मिळावी यासाठी गावातील मंडळींनी प्रयत्न करावे. तसे ते करतात.याच शाळांमध्ये त्यांची स्वतःची मुलं सुद्धा असतात. परिसरामध्ये सर्वच बाबी मुलांच्या निकोप वाढीसाठी योग्य असतीलच असे नाही. अनेकदा अनेक अनैतिक बाबी आजूबाजूला घडत असतात. यामध्ये व्यसनाधीनता, गुन्हेगारी, आक्रमकता, भांडण, मारामारी, अनेक मनोविकार असलेल्या व्यक्ती, यांचा समावेश असतो. गरिबी, दारिद्र्य या पण बाबी विद्यार्थ्यांच्या मनावर विपरित परिणाम करीत असतात. अशा सगळया अनैतिक गोष्टींच्या आहारी शाळेतील, गावातील किशोरवयीन मुले जात असतात. त्यांच्या घरचे वातावरण मुलांच्या विकासाला अनुरूप नाही, ज्यांना सांभाळून घ्यायला आधार द्यायला घरी कुणी नाही अशी मुलं व इतरही मुले अपप्रवृत्तींच्या आहारी जाऊ शकतात. या सर्व मुलांना सांभाळण्याची जबाबदारी नक्कीच समाजाची आहे. यामध्ये एन.जी.ओ., काही सुधारक मंडळी, युवक मंडळ, महिला मंडळ, बचत गट यांनी अशाप्रकारे एकाकी पडलेल्या मुलांचे आधार बनून त्यांना योग्य मार्ग दाखविणे गरजेचे आहे. गावामध्ये चांगल्या वक्त्यांची भाषणे आयोजित करणे, विद्यार्थ्यांना समुपदेशन करणे, त्यांच्या गरजा गावाच्या परिसराच्या लोकांच्या सामुहिक प्रयत्नातून पूर्ण करणे व त्यांना योग्य दिशा दाखवणे हे समाजासाठी एक आव्हानच आहे.

**यशोगाथा -**

काही शाळांमध्ये इयत्ता दहावीच्या नंतर कलचाचणीच्या अहवालाच्या आधारे विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन करण्याचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने केले जाते.. मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी काम करतात. त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने त्यांना योग्य दिशा देण्याचे काम करतात. कधीकधी मुलांचा कल, क्षमता यांचा विचार न करता पालक मुलांकडून अवास्तव अपेक्षा करतात अशावेळी मध्यस्थी करून मुख्याध्यापक व शिक्षकांकडून पालकांचे समुपदेशन केले जाते. त्यांची मानसिकता बदलली जाते. पालक व विद्यार्थी यांचे एकमत होईपर्यंत हे काम शिक्षकांना करावे लागते. अतिशय महत्त्वपूर्ण असलेले हे काम काही शाळांमध्ये झालेले आहे अशा वेळी शिक्षकांना कशा पद्धतीने पुढे जावे लागले, कोणते अनुभव आले, हे त्यांचे अनुभव आपल्याला ही उपयोगाचे ठरू शकतात.

**यशोगाथा 1 - Covid-19** या काळामध्ये शाळा महाविद्यालये बंद होती. रस्त्यावर शुकशुकाट होता. जमावबंदीचा कायदा होता. सगळी वाहतूक ठप्प झालेली होती, जणू काही काळ थांबला होता. अशा अटीतटीच्या काळात असंख्य प्रश्न निर्माण झाले होते. त्यात करिअर पोर्टलची लिंक मिळाली.

जून महिन्यात शिक्षकांना शाळेत बोलावून घेतले, महाकरिअर पोर्टल बद्दल मार्गदर्शन केले. महाकरिअर पोर्टल पालक शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी कसे व किती महत्त्वपूर्ण आहे याची माहिती पटवून दिली. ही लिंक विद्यार्थ्यांपर्यंत कशी पोहोचवता येईल याविषयी चर्चा केली. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या हजेरी पटावरील त्यांच्या नावापुढे असलेल्या फोन नंबर वर मुलांना फोन करण्यात आले. एकूण 273 विद्यार्थ्यांपैकी 222 विद्यार्थ्यांशी फोनद्वारे संपर्क होऊ शकला. या सर्वांचा एक व्हाट्सॲप ग्रुप तयार करण्यात आला. या महाकरियर पोर्टल विषयीची माहिती या ग्रुपवरून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली. त्यांचा सरल आय.डी. क्रमांक सुद्धा या ग्रुप वर टाकून त्यांना महाकरिअर पोर्टलची लिंक देऊन हे पोर्टल कसे बघावे, त्याचा उपयोग कसा करावा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निरसन शाळेतील शिक्षकांनी केले. श्री बोबडे सर, श्री मून सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. दहावीचा निकाल लागल्यानंतर शाळेत मार्कलिस्ट घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना आम्ही सर्वांनी मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे पोर्टल अतिशय उपयोगाचे आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या मध्ये नेमके काय चांगले आहे, कोणत्या विषयात त्यांना गती आहे याविषयीची माहिती मिळते. पुढील दिशा ठरविता येते.

**श्री. ए.आर.ढोमणे, मुख्याध्यापक, यशवंत हायस्कूल गुमगाव, पं.स.-हिंगणा,जिल्हा-नागपूर**

**चिंतनात्मक प्रश्न:**

1) कोविड-19 च्या काळात मुलांना व्यवसायिक मार्गदर्शन गरजेचे का वाटले?
2) महाराष्ट्रातील शिक्षकांनी त्यावर कशा प्रकारे मात केली?
3) महकरिअर पोर्टल app ची उपयुक्तता लिहा.

**यशोगाथा 2 –**

लॉकडाउनच्या काळात राज्यातील सर्व 408 समुपदेशकांची ऑनलाइन सभा घेण्यात आली. आपल्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन करावे लागेल. काळ मोठा कठीण आहे. विद्यार्थ्यांना अशा वेळी आपली खूप गरज आहे. त्यांचे सगळे आयुष्य पुढे आहे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वळण देण्याचे, त्यांना व्यवसाय मार्गदर्शन करण्याचे काम करण्यासाठी आपल्याला शाळेत नाही तर प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरात पोहचायचे आहे, असे आवाहन माननीय दिनकर पाटील माजी संचालक, एस.सी. ई. आर.टी. पुणे यांनी केले; आणि आम्ही सगळेच त्यांच्या या वक्तव्यातून प्रेरित झालो. अशातच 22 मे 2020 रोजी राज्याच्या शिक्षण मंत्री, माननीय वर्षाताई गायकवाड यांनी महाकरिअर पोर्टल ॲपचे उद्घाटन करून आम्हां समुपदेशकांच्या ज्ञानात आणखी भर घातली. करिअर करता येतील अशी विविध क्षेत्रे, कॉलेज, प्रवेश परीक्षा आणि शिष्यवृत्ती यांविषयी सविस्तर माहिती सर्व समुपदेशकांसमोर मांडली. सर्व समुपदेशकांना विद्यार्थ्यांचे फोन येणे सुरु झाले. दिवसाला चाळीस-पन्नास विद्यार्थ्यांचे फोन घेणे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वानुसार, कलचाचणीच्या अहवालानुसार मार्गदर्शन करणे, खूप कठीण जात होते, पण आम्ही ते केले. अशातच एक दिवस प्रतिज्ञाचा फोन आला. फोन उचलल्यानंतर तिकडून तिचा आवाज आला. ती विचारत होती "सर मी कोणती शाखा घेऊ?" तिच्या भावना माझ्या लक्षात आल्या. मी तिला प्रतिप्रश्न केला प्रतिज्ञा काय झाले? तुझा आवाज असा का? माझे हे प्रश्न ऐकून तिच्या भावनांचा बांध मोकळा झाला. तिने रडत सांगितले की, सर माझ्या बाबांनी दोन दिवसापूर्वी आत्महत्या केली आहे. त्यामुळे तुम्ही आता मला काय मार्गदर्शन करणार! या घटनेमुळे ती खूप दु:खी होती. सर्व संपल्याची भावना तिच्यामध्ये निर्माण झाली होती. हळू हळू तिला शांत केले. दोन चार दिवसानंतर बोलू असे सांगितले. चार दिवसानंतर तिला मी स्वतः फोन केला. त्यानंतर आठ दिवसानंतर तिच्याशी परत एकदा बोललो. तीन सेशन्स झाल्यानंतर ती हळूहळू बोलती झाली, सावरली. तिच्या घरची परिस्थिती जेमतेम होती. घरी आई आणि लहान भाऊ होता. तिला आता घर सांभाळून पुढचे शिक्षण घ्यावे लागणार होते. पार्टटाइम काम करावे लागणार होते. तिचे सायन्स विषयाचे ज्ञान, कलचाचणीचा अहवाल आणि लवकर स्वतःच्या पायावर उभे राहण्याची तिची गरज, या दृष्टिकोनातून पॅरामेडिकल अभ्यासक्रमाला ऍडमिशन घ्यावी व त्यानुसार एखाद्या नर्सिंग होम मध्ये पार्टटाईम नोकरी करावी म्हणजे तिचे व तिच्या भावाचे शिक्षण सुरू राहून घराला हातभार लागेल असे तिला सुचविले. तिला व तिच्या आईलाही ते पटले, आणि प्रतिज्ञा पुढील वाटचालीस सिद्ध झाली. त्यामुळे मला मिळालेले मानसिक समाधान शब्दांत व्यक्त करू शकत नाही.

**श्री.योगेश्वर राऊत , समुपदेशक, डिप्लोमा इन करिअर कौन्सिलिंग मुंबई.**

**चिंतनात्मक प्रश्न :**

1) या यशोगाथेमधील प्रतिज्ञा अस्वस्थ का आहे ?
2) श्री.राऊत सर आणि प्रतिज्ञा यांचा संवाद झाला नसता तर............
3) प्रतिज्ञा अस्वस्थतेतून बाहेर कशी निघाली?

**यशोगाथा - 3**

व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशनाचे काम करताना मुख्याध्यापकांना तसेच समुपदेशकांना वेगवेगळे अनुभव येतात. असाच एक अनुभव श्री. हरीश राठी यांना आला. समुपदेशक म्हणून काम करताना विद्यार्थी व पालक यांचे जेव्हा एकमत नसते, तेव्हा समुपदेशनाचे काम करणे फार कठीण असते. सरांना एका पालकाचा फोन आला. त्या पालकाच्या स्वरात काळजीचे भाव होते. त्यांच्या मुलाला मागील वर्षी इयत्ता 10 वी ला 96% मार्क्स होते. त्याचे अभ्यासात लक्ष्य नव्हते. तो फक्त मोबाईल ,संगणक यातच रमत होता. मुलाचे वडील मोठे उद्योजक आहेत. घरात मोठे दुकान आहे, पण वडील मुलाला दुकानात येऊ देत नव्हते. त्याला दिवसभर वेगवेगळया कोचिंग क्लासेसमध्ये व कॉलेज मध्ये व्यस्त ठेवत होते. जेव्हा त्यांना मुलाबद्दल विचारले, तेव्हा त्यांनी सरांना मोठ्या अभिमानाने सांगितले की, त्याला मागील वर्षी 96% मार्क्स मिळाले. आम्ही त्याला सायन्स शाखेला घातले आहे. तुम्ही सुद्धा तुमच्या मुलाच्या बाबत हेच कराल ना ! त्यावेळी राठी सर फार गोंधळून गेले. काय करावे, हे त्यांना कळेना. सागर राठी सरांसोबत बोलायला तयार नव्हता. वडील त्याच्यावर जबरदस्ती करायचे. त्यामुळे चार शब्द बोलून त्याने फोन ठेवला. एक गोष्ट सरांना सतत जाणवत होती की, काहीतरी गडबड आहे. गरजू मुलांसाठी नागपूर जिल्ह्यातील सर्वच समुपदेशक घरपोच सेवा देत होते. पुन्हा एकदा सागरच्या बाबांचा फोन सरांना आला. त्यांनी सांगितले "काहीही करा सर, पण माझ्या मुलाशी बोला. राठी सरांनी त्यांना व्हिडिओ काल करायला सांगितले. सागर सोबत बोलायला सुरुवात केली. आधी तो काहीही बोलायला तयार नव्हता; पण तो हळूहळू बोलू लागला. त्याला घरच्या दुकानात जायला आवडत होते, पण त्याच्या वडिलांना ते आवडत नव्हते. त्यामुळे ते मुलाला दुकानात येण्यास मनाई करायचे. सागरला कॉमर्सची आवड होती, पण वडिलांच्या जबरदस्तीमुळे त्याने नाखुशीने सायन्सला ॲडमिशन घेतली होती.

राठी सर सागरच्या वडिलांसोबत बोलले तर ते उलट सरांनाच विचारू लागले की, तुमच्या मुलाला जर 96% मार्क्स मिळाले, तर तुम्ही काय करणार. त्याच्या वडिलांना समजावण्याचा खूप प्रयत्न करूनही त्याचे वडील ऐकायला तयार नव्हते. अखेरीस सागरला समजाविले की, तू सायन्स घेऊन नंतर ग्रॅज्युएशन साठी कॉमर्स घेऊ शकतोस, पण सागरचा या गोष्टीवर विश्वास नव्हता. त्याला वाटायचे की, 12 वी ला जर त्याला चांगले गुण मिळाले तर JEE/NEET या परीक्षा वडील त्याला द्यायला लावतील. त्यापेक्षा "मी घरातून पळून जाईन किंवा आत्महत्या करीन." सागरचे अशा प्रकारचे वक्तव्य राठी सरांनी रेकोर्डिंग करून ठेवले होते, हे सागरच्या वडिलांनी ऐकल्याबरोबर त्यांना खूप धक्का बसला व आपले काहीतरी चुकले याची त्यांना जाणीव झाली. सागरचे वडील सागरला त्याच्या मनाप्रमाणे शिकू द्यायला तयार झाले. बारावी सायन्स केल्यानंतर त्याने कॉमर्स घ्यावे, यासाठी ते तयार झाले. त्यानंतर सागरने C.A. Foundation परीक्षेची तयारी करून परीक्षा दिली. आवडीच्या विषयाचे शिक्षण घेताना सागर आता मजेत आहे. त्याचा आत्मविश्वास वाढला आहे. या मुलाने वडिलांच्या आजारपणात त्यांचा व्यवसाय व्यवस्थित सांभाळला. भविष्यात तो सी.ए. होणार. राठी सरांच्या प्रयत्नांमुळे सागरला त्याच्या आवडीच्या क्षेत्रात शिकता येत आहे.
**श्री. हरीश राठी**,समुपदेशक,लखोटिया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,कोंढाळी,जिल्हा नागपूर

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020(NEP2020) च्या अनुषंगाने मोड्यूलची उपयुक्तता -**

राष्ट्रीय शिक्षण आयोग 2020 NEP 2020 मध्ये व्यवसायिक शिक्षणावर अधिक विचार केलेला आहे. व्यावसायिक शिक्षणाची तयारी करणाऱ्या शिक्षणात नीतिनियम, सार्वजनिक उद्देश, नैतिकता, शाखा, व्यावहारिक शिक्षण या सर्व बाबींचा समावेश असावा असे NEP-2020 मध्ये सांगितले आहे.

- व्यावसायिक शिक्षणात शेती विद्यापीठे, कायदा विद्यापीठे, आरोग्य विज्ञान विद्यापीठे, तांत्रिक विद्यापीठे आणि इतर विषयांची एकल विश्वविद्यालये यांचा उद्देश स्वतःला एक बहुशाखीय संस्थेच्या रुपाने विकसित करून बहुविद्याशाखीय आणि सर्वांगीण शिक्षण प्रदान करण्याचा असेल. या सर्व व्यावसायिक किंवा सामान्य शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये 2030 पर्यंत हळूहळू दोन्ही प्रकारचे शिक्षण प्रदान करण्यात येईल.
- कृषी शिक्षणास पुनरुज्जीवित केले जाईल. कृषी उत्पादन क्षमता आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी कृषी व त्यासंबंधित शाखांत सुधारणा करण्यासाठी कुशल पदवीधर, तंत्रज्ञ, नाविन्यपूर्ण संशोधन आणि बाजाराधारित विस्ताराद्वारे तंत्रज्ञान आणि पद्धतीशी जोडणी केली जाणे आवश्यक आहे.
- सामान्य शिक्षणाशी जुळणाऱ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून कृषी पशुवैद्यकीय, कृषी तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रातील व्यावसायिकांची तयारी करून घेतली जाईल.
- राज्यातील कायदा विषयक शिक्षण देणाऱ्या संस्था, तसेच आरोग्यविषयक शिक्षण देणाऱ्या संस्था यांनी जागतिक स्तरावर स्पर्धात्मक असणे, आवश्यक आहे. याच वेळी सामाजिक,आर्थिक आणि राजकीय या न्यायाच्या घटनात्मक मूल्यांनी संवर्धित, निर्देशित लोकशाहीची साधने आणि मानवी हक्कांच्या माध्यमातून राष्ट्रीय पुनर्रचना करण्यासाठी प्रयत्न व्हायला पाहिजे.
- भारताच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या तांत्रिक शिक्षणामध्ये अभियांत्रिकी तंत्रज्ञान, व्यवस्थापन, वास्तुकला, नगर रचना, औषध निर्माण, हॉटेल व्यवस्थापन, खानपान तंत्रज्ञान पदवी आणि पदविका यांचा समावेश होतो. या क्षेत्रात केवळ उच्चशिक्षित मानव संसाधनांची आवश्यकता नसून याबरोबरच उद्योग आणि उच्च शिक्षण संस्था यांच्यामध्ये नवोपक्रम व संशोधन यांना चालना देण्यासाठी घनिष्ठ संबंध आणि समन्वय यांची आवश्यकता असेल.
- तंत्रज्ञानाचा मानवी प्रयत्नांवर प्रभाव अपेक्षित आहे. यामुळे तांत्रिक शिक्षण व अन्य विषयातील अंतर समाप्त होण्याची शक्यता आहे.
- अत्याधुनिक महत्त्वपूर्ण क्षेत्रे जसे जनुकीय अभ्यास जैवतंत्रज्ञान, सूक्ष्म तंत्रज्ञान, चेताविज्ञान, शास्त्र त्याचबरोबर गतीने प्रमुख गोष्टी साध्य करणारे कृत्रिम बुद्धिमत्ता त्रिमिती यांत्रिकीकरण, व्यापक आधार सामग्रीचे विश्लेषण, आणि यांत्रिक शिक्षण यासारख्या अत्याधुनिक क्षेत्रामध्ये व्यावसायिक तयार करण्यात भारताने देखील पुढाकार घेणे आवश्यक आहे. असे सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये आवश्यक सुधारणा करून समाजाभिमुख करण्याचे NEP-2020 मध्ये प्रस्तावित आहे.
- राष्ट्रीय चाचणी संस्था NTA उच्च दर्जाची सामान्य कलचाचणी आयोजित करेल. त्याचप्रमाणे वर्षातून दोनदा विज्ञान, मानवी विज्ञान, भाषा, कला आणि व्यवसायिक विषय यांच्या विशेष सामान्य विषयांच्या परीक्षा आयोजित करण्यात येतील.
- देशातील तसेच प्रत्येक राज्यातील विद्यार्थ्यांना निकषाप्रमाणे त्यात सहभागी होण्याची संधी मिळेल. या परीक्षांचा उद्देश विद्यार्थ्यांचे संकल्पनात्मक ज्ञान आणि त्याचे उपयोजन करण्याची क्षमता तपासणे हा असेल. विद्यार्थी परीक्षेसाठी विषय निवडू शकतील. आणि प्रत्येक विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र विद्यार्थी संचयिकेतील विषय कार्य पाहून आणि विद्यार्थ्यांना त्यांची रूची, प्रावीण्य यांच्या आधारावर संबंधित अभ्यासक्रमात प्रवेश देऊ शकतील.
- शेकडो विद्यापीठांना प्रत्येकाची स्वतंत्र परीक्षा असण्यापेक्षा राष्ट्रीय चाचणी संस्थेची **NTA** चाचणी सेवा उच्च दर्जा व्याप्ती व लवचिकता यामुळे सामान्य प्रवेश परीक्षा म्हणून आयोजित करणे शक्य होईल.

- महाराष्ट्र राज्यामध्ये इयत्ता दहावी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कलचाचणीचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये कलचाचणी अहवालाच्या आधारे विद्यार्थ्यांना त्यांचा कल, क्षमता, प्रावीण्य लक्षात घेऊन व आवश्यकतेनुसार समुपदेशन करून, शाखा किंवा अभ्यासक्रम निवडण्यास मदत करण्यात येते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तरावर देखील **NTA** राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या मार्फत सामान्य कलचाचणी घेण्याचे NEP 2020 मध्ये प्रस्तावित आहे. त्याचा उपयोग निश्चितपणे विद्यार्थ्यांना होईल.

**शालेय नेतृत्वासाठी मोड्यूलची उपयुक्तता -**

विद्यार्थ्याला एक सुजाण, सुसंस्कृत, सुशिक्षित नागरिक म्हणून विकसित करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. मुले शाळेत जायला लागल्यापासून एकेक इयत्ता पुढे पुढे जात राहतात. जेव्हा ही मुले इयत्ता दहावी मध्ये येतात तेव्हा मात्र समोर अनेक मार्ग असतात. हा टप्पा खूप महत्वाचा असतो. हा टप्पा म्हणजे आयुष्याचा टर्निंग पॉइंट असतो. आणि या वेळेला विद्यार्थ्यांना जर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनुसरून योग्य मार्गदर्शन मिळाले, कोणत्या मार्गाने जायचे याविषयी मदत करणारे हात मिळाले, तर नक्कीच त्यांना यशाचे शिखर गाठता येईल. आणि नेमकी ही मदत आपण या महत्त्वाच्या वळणावर व्यवसाय मार्गदर्शन आणि समुपदेशनातून करतो आहोत. एकूणच समुपदेशन ही विद्यार्थ्यांची मानसिक गरज आहे. जास्तीत जास्त समुपदेशकांनी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे. तसेच प्रत्येक शाळेतील मुख्यध्यापकांनी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत ही मदत पोहोचवली, तर सर्वांना न्याय मिळू शकेल. मुलांना भविष्याची वाट निवडण्यास मदत होईल. सदर मोड्यूल शिक्षण विभागात काम करणारे अधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, समुपदेशक सर्वांच्या दृष्टीने उपयुक्त असे आहे. शाळेच्या मुख्याध्यापकांची या कार्यात मोलाची भूमिका असते. कारण माध्यमिक स्तरावरची सर्व मुले मुख्याध्यापकांच्या व शिक्षकांच्या प्रत्यक्ष संपर्कात असतात.

**संदर्भ सूची**


1. One month certificate course in school leadership and manegment (Resourse Book)November 2016)
2. Self help publication 2014,Career Guidance
3. शिक्षक मार्गदर्शिका व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था मुंबई
4. भविष्याचे सप्टेंबर 2012
5. National Education Policy 2020
6. विजय कोतवाल संवाद प्रकाशन करिअरनामा
7. पाटील बा. ह. व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था मुंबई कलचाचणी मार्गदर्शिका, “एक नजर आश्वासक भविष्यावर
8. https://drive.google.com/file/d/1-Su14AEO2HUwinUCpTm-6TeaTg0J3_uM/view?usp=sharing
9. https://drive.google.com/file/d/1vdL9H3ANOdmccoRPPJ4xnP1bsxwwUdcz/view?usp=sharing
10. https://drive.google.com/file/d/1EshRAGZBmijZHFbn_5h9tFVFAPpEIDrJ/view?usp=sharing
11. https://drive.google.com/file/d/1KkAchF4YXkCXNUmx6agjSpP0BfZaas2j/view?usp=sharing
12. https://drive.google.com/file/d/1njmNTqstdHnjdZnCtgLKYCwvpiLtyJ23/view?usp=sharing
13. https://drive.google.com/file/d/1vdL9H3ANOdmccoRPPJ4xnP1bsxwwUdcz/view?usp=sharing



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| डॉ. सीमा पुसदकर<br>वरिष्ठ अधिव्याख्याता,<br>प्रादेशिक विद्या प्राधिकरण ,<br>नागपूर | डॉ.ज्योती कुलकर्णी<br>समन्वयक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व<br>प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद | डॉ.नेहा बेलसरे<br>संचालक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व<br>प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |